**<u>फौजदारी किरकोळ अर्ज क्र. १००/२०२१ मधील</u>**

**<u>निशाणी क्र. २५ वरील आदेश</u>**

**०१.** प्रस्तुतचा अर्ज हा गैरअर्जदाराने प्रकरण बंद करण्याकरिता दाखल केलेला आहे. अर्जदारास संधी देवुनही अर्जदारातर्फे प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करण्यात आले नाही.

**०२.** गैरअर्जदार यांनी स्वत: प्रस्तुत अर्जावर युक्तीवाद केला. अर्जदाराचे वकील श्री वरघट यांनी तोंडी युक्तीवाद करुन अर्ज नामंजुर करण्याची विनंती केलेली आहे.

**०३.** गैरअर्जदाराने अर्जामध्ये असे कथन केलेले आहे की, अर्जदाराचा प्रियकर याने दिनांक २५/१०/२०२५ रोजी दुपारी ४.०० वाजता भारत पेट्रोल पंपाजवळ रस्त्यावर त्याला थांबविले व अर्जदारास सोडुन दे, अर्जदाराने दुसरे लग्न केलेले आहे, तिने तिचा दुसरा नवरा मारुन टाकलेला आहे, तु तुझ्या पत्नीला फारकती दे, नाही दिली तर तुला जिवाने मारतो अशी धमकी दिली. त्याबाबत त्याने दिनांक ०३/११/२०२५ रोजी पोलिस ठाणे येथे तक्रार दिली असुन त्यावरुन अदखलपात्र गुन्हा नोंद झालेला आहे. त्याने अर्जात पुढे असे कथन केलेले आहे की, दिनांक ०४/१२/२०२५ रोजी तो मंगरुळपीर येथुन त्याच्या आईसोबत घरी जात असतांना विशाल सुरेश राउत हा त्याला भेटला व पत्नीला फारकत दे व तिला १० लाख रुपये दे, जुना रिपोर्ट मागे घे, नाहीतर तुला जिवे मारुन टाकील अशी धमकी देवुन तुझ्या मायचा फोदा, तुझ्या मायला झव अशी शिवीगाळ केली. त्याबाबत त्याने दिनांक १३/०१/२०२६ रोजी पोलिस ठाणे मंगरुळपीर येथे रिपोर्ट दिलेला आहे व त्यावरुन पोलिसांनी अदखलपात्र गुन्हा नोंद केलेला आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरण खारीज करण्याची विनंती ते करतात.

**०४.** याठिकाणी नमुद करावे लागेल की, अर्जदाराने त्याला धमकी दिल्याचे कोणतेही कथन गैरअर्जदाराने केलेले नाही. केवळ एका व्यक्तिने त्याला धमकी दिल्याचे कथन केल्यावरुन व त्यावरुन अदखलपात्र गुन्ह्याची नोंद झाल्यावरुन प्रस्तुत प्रकरण निश्‍चितच बंद करता येणार नाही अथवा खारीज करता येणार नाही. अर्जदाराने

कथन केलेल्या बाबी अंतिम युक्तीवादावेळी गृहित धराव्या लागतील. करिता खालिल आदेश पारित करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>.**

अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

SUBHASH DATTARAO TARE Digitally signed by SUBHASH DATTARAO TARE Date: 2026.04.06 12:53:15 +0530

मंगरुळपीर (सुभाष द. तारे)
दिनांक :— ०६/०४/२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
२ रे न्यायालय, मंगरुळपीर

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/ Order are same word to word as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Court | :- | 2nd Jt. Civil Judge (Jr.Dn.) and J.M.F.C., Mangrulpir, Dist. Washim. |
| Presiding Officer | :- | Subhash D. Tare |
| Judgment uploaded by | :- | R. T. Sharma (Junior Clerk) |
| Date of Judgment | :- | 06.04.2026 |
| Judgment/Order signed by the presiding officer on | :- | 06.04.2026 |
| Judgment/Order uploaded on | :- | 06.04.2026 |